पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/१०८९/२०१७
दिनांक – २३/०६/२०१७

प्रति,

मा.........................................,
सदस्य, स्थायी समिती,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

विषय - पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा दिनांक - २८/०६/२०१७ रोजी आयोजित केले बाबत....

महोदय/महोदया,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २८/०६/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सोबत सभेची कार्यपत्रिका जोडली आहे. सभेस आपण उपस्थित रहावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - १) सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
२) कार्यालयीन नोटीस बोर्ड

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११ ०१८.

मा.स्थायी समिति

कार्यपत्रिका क्रमांक – १५

दिनांक - २८/०६/२०१७ वेळ – दुपारी ०२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची साप्ताहिक सभा बुधवार, दिनांक २८/०६/२०१७ रोजी दुपारी ०२.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली आहे. सभेत खालील कामकाज होईल.

----------

विषय क्र.१) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वैद्यकिय विभागाअंतर्गत राष्ट्रीय कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करणेकामी आवश्यक लागणा-या ३ ते ५ वर्षाच्या आतील टुरिस्ट परमिट (पिवळे नंबर प्लेट) असलेल्या ११ टाटा सुमो अथवा तत्सम वाहने (६+१) भाडेतत्वावर घेण्याबाबत निविदा क्रं.१५/२०१५–२०१६ मधील लघुत्तम निविदाधारक ओम एंटरप्रायजेस यांचे प्राप्त दर, प्रतिवाहन प्रतिदिन ६० किमीसाठी र.रु.१५००/- प्रमाणे व पुढील ६० किमीसाठी ८.५० दर या प्रमाणे मान्यता घेण्यात आली आहे. भोसरी रुग्णालयाच्या अंतर्गत मोशी, च-होली करिता १ वाहन व तालेरा रुग्णालयाच्या अंतर्गत पुनावळे व किवळे दवाखान्यासाठी १ वाहन असे एकुण वाढीव २ वाहनाकरिता १६ महिन्यासाठी निविदेतील लघुत्तम दरानुसार वाढीव गाड्यांसाठी र.रु.१२,००,०००/- (अक्षरी र.रू. बारा लाख फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २८/०६/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.२) शासन निर्णय क्रं. एनयुआर-२०१३/प्रक.३३८/नवि-३३ मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १८/०२/२०१४ नुसार सदर संचलन तूट महानगरपालिकेच्या मुख्यलेखापरिक्षक यांनी लेखापरिक्षण करून प्रमाणीत करणे बंधन कारक राहील असे स्पष्ट केले आहे त्यानुसार मा.मुख्यलेखापरिक्षक यांनी क्रं.मुलेप/१६/२०१७ दि.११/०४/२०१७ अन्वये लेखापरिक्षण अहवाल सादर केलेला आहे. सह व्यवस्थापकिय संचालक यांचे कडील पीएमपीएमएल/मुलेविअ/७८३४ दि.२१/०३/२०१७ नुसार उर्वरित र.रू.५,७२,२१,७४९/- निधी मिळणे करीता मागणी केली आहे. एकुण संचलन तुटी पैकी ४०% प्रमाणे र.रू.६०,७२,२१,७४९/- पैकी संचलन तूटी पोटी र.रू.५५ कोटी पीएमपीएमएल यानां अदा करणेत आले असुन उर्वरीत संचलनतूट र.रू.५,७२,२१,७४९/- अदा करावयाचे आहेत. सन २०१५-१६ मध्ये देय होणारी संचलनतुट समायोजन करण्याच्या अटीस अधीन राहून उर्वरीत संचलनतूट र.रू.५,७२,२१,७४९/(अक्षरी र.रू.पाच कोटी बहात्तर लाख एकविस हजार सातशे एकोणपन्नास फक्त) अदा करणेस व सदरचा खर्च लेखा विभागा कडील सन २०१७-१८ च्या अंदाजपत्रकातील “पीएमपीएमएल निधी” या लेखाशिर्षातुन खर्ची टाकण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २८/०६/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.३) सन२०१६–१७ या शैक्षणिक वर्षात विद्यालयांची शैक्षणिक सहल आयोजित केलेनुसार सायन्स पार्क व पीएमपीएमएल यांना मा. स्थायी समितीचे मान्यतेने बील अदा करणे आवश्यक असल्याने माध्यमिक शिक्षण विभागाचे सन २०१७–१८ चे अंदाजपत्रकात विविध उपक्रम या लेखाशिर्षावर र.रु.६,५०,००,०००/- इतकी तरतुद करणेत आली असुन सदरची रक्कम रु.१६,५२,९८८/-(अक्षरी रक्कम रु.सोळा लाख बावन्न हजार नऊशे अठ्याऐंशी फक्त) या लेखाशिर्षातुन खर्ची टाकुन अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि. २८/०६/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.४) अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांचे तर्फे प्रो.बी.जी.बिराजदार व प्रो.एस.एन.सपाली यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रातील सांगवी स्मशानभूमीत पर्यावरणपूरक गॅस शवदाहिनी बसविणेच्या कामा बाबतचा तज्ञ आर्थिक व तांत्रिक सल्ला देणेसाठी अंदाजपत्रकीय दराच्या १%+सेवाकर एवढी सल्लागार फी र.रू.१,३६,८००/- (अक्षरी र.रू. एक लाख छत्तीस हजार आठशे फक्त) मा.संचालक, अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे यांस अगावु अदा करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

(दि.२८/०६/२०१७ रोजीचे सभेत घेणेचे निर्णया प्रमाणे)

विषय क्र.५) क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील पावसाळी गटर्स चेंबर्स खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करुन मोशी कचरा डेपोत खाली करुन पसरुन देणेकामी निविदा नोटीस क्र.३/२०१७-२०१८ साठी ३ प्राप्त झालेल्या निविदांपैकी मे अण्णासाहेब मगर स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांनी ८.५% कमी दराने काम करण्यास मान्यता दर्शविलेली आहे. या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या र.रू.७,१३,०००/- (अक्षरी र.रू. सात लाख तेरा हजार फक्त) पेक्षा ८.५% कमी या दराने आलेली निविदा सर्वात कमी दरांची असल्याने स्विकारणेबाबत मा. क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.१५/०६/२०१७ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार मे अण्णासाहेब मगर स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था यांचेकडून निविदा मंजूर दराने र.रू.६,५२,३९५/- पर्यंत काम करून घेणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.६) क क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील नाले खरडून साफ करणे व त्यातून निघालेला गाळ, कचरा, राडारोडा वाहतूक करुन मोशी कचरा डेपोत खाली करुन पसरुन देणेकामी निविदा नोटीस क्र.१/२०१७-२०१८ साठी ३ प्राप्त झालेल्या निविदांपैकी श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था यांनी १०% कमी दराने काम करण्यास मान्यता दर्शविलेली आहे. या ठेकेदाराची निविदा रक्कमेच्या र.रू.९,९९,६९७/- (अक्षरी र.रू. नऊ लाख नव्याण्णव हजार सहाशे सत्यान्नव फक्त) पेक्षा १०% कमी या दराने आलेली निविदा सर्वात कमी दरांची असल्याने स्विकारणेबाबत मा.क्षेत्रीय अधिकारी यांनी दि.०७/०६/२०१७ रोजीचे प्रस्तावान्वये मान्यता दिलेली आहे. त्यानुसार श्री.संत साई स्वयंरोजगार सेवा संस्था यांचेकडून निविदा मंजूर दराने र.रू.८,९९,७२७/- (अक्षरी र.रू.आठ लाख नव्यान्नव हजार सातशे सत्तावीस फक्त) पर्यंत काम करून घेणेत आले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.७) स्थानिक संस्थाकर विभागासाठी मनपा कामकाजास्तव उपलब्ध करून देणेत आलेले स्थानिक संस्था कर विभागाच्या वापरातील म.न.पा. वाहन क्र MH-१४ AE- ८१६४ (टाटा सुमो) करीता 185/85 R16 LT CZAR H/TI 105 set या साईजचे पाच नग नविन टायर्स– टयुब मे.सीएट लि. उत्पादीत कंपनी गणराज एंटरप्रायजेस चिंबळी फाटा कुरूळी खेड यांचेकडून थेट पध्दतीने करारनामा न करता खरेदी करणेस व त्याकामी येणा-या अगावू एकूण र.रू.२३,२६८/-(अक्षरी र.रू.तेवीस हजार दोनशे आडुसष्ट फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.८) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१ ते २) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटीशर्ती प्रमाणे तसेच भागवाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.९) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३३/०९/२०१६-१७ अन्वये प्रभाग क्र.२४ मध्ये जेष्ठ नागरिकांसाठी विविध सुविधा पुरविणेकामी मे.अविष्कार कन्स्ट्रक्शन नि.र.रु.१३,६८,८५६/- (अक्षरी र.रु.तेरा लाख अडुसष्ठ हजार आठशे छप्पन रुपये फक्त) पेक्षा १०.०२% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.१२,९३,२८१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करुन कामाचा आदेश देणेत आलेला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड मनपाच्या वाय.सी.एम. रुग्णालयातील एम.आर.आय. सेंटर मे.रुबी एलकेअर यांना दि.९/५/२०११ पासून ५ वर्षे कालावधीसाठी CGHS च्या (-)२७% दराने without contrast व with contrast MRI करुन देणेकामी करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत करणेत आले होते. सदर करारनाम्याची मुदत संपत आली असलेने तसेच नवीन जादा क्षमतेचे MRI मशिन निविदा प्रक्रियेद्वारे खरेदी करणेकामी लागणारा कालावधी विचारात घेता मे.रुबी एलकेअर यांना दि.०८/०२/२०१७ पासून किमान नऊ महिने कालावधीसाठी (दि.०८.११.२०१७ पर्यंत) पूर्वीच्या करारनाम्यास अधिन राहून मुदतवाढ देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.११) मुख्य लेखा परिक्षण विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरी कामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावा सोबतचे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१२) मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील नि.नो.क्र.८१/१/१६-१७ वॉर्ड क्र.२४ (नवीन प्र.क्र.२९) इंद्रायणीनगर से.नं. १ महाराष्ट्र कॉलनी शेजारी मोकळा भुखंड क्र.३ मध्ये पोहण्याचा तलाव बांधणेकामी मे.बी.के.खोसे नि.र.रु.८,८५,९८,९२५/- (अक्षरी र.रु. आठ कोटी पंच्याऐंशी लाख

अठ्ठयान्नो हजार नऊशे पंचवीस फक्त) पेक्षा १.३५% जास्त या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.८,९७,९५,०१०/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करुन घेणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१३) मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील नि.नो.क्र.३८/८/१६-१७ प्रभाग क्र.४३ जिजामाता हॉस्पीटल येथील विविध म.न.पा. शाळा, सांस्कृतीक केंद्रे, व्यायामशाळा, दवाखाना इमारतीची रंगरंगोटी, देखभाल व दुरुस्तीची कामे करणेकामी मे.एल.एन. एंटरप्रायजेस नि.र.रु.१४,००,१४१/- (अक्षरी र.रु. चौदा लाख एकशे एक्केचाळीस फक्त) पेक्षा ६.९०% कमी या ठेकेदारा कडुन निविदा मंजुर दराने र.रु.१३,०३,५३१/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरा मध्ये कंत्राट कालावधी मध्ये झालेली वाढ/ घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१४) मनपाच्या स्थापत्य् विभागाकडील निनो.क्र. २२/२६/१६-१७ प्रभाग क्र.३० चक्रपाणी वसाहत मध्ये ठिकठिकाणी खडीमुरुम पद्धतीने रस्त्यांची सुधारणा करणेकामी मे. अनंत बाळकृष्ण बहिरट नि.र.रु.१०,५०,४२०/- (अक्षरी र.रु. दहा लाख पन्नास हजार चारशे वीस फक्त) पेक्षा २७.७२% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.७,५९,२४४/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राटकालावधी मध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१५) मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.३८/४४/१६-१७ प्रभाग क्र.५७ पिंपळे गुरव येथील विविध आरक्षणे विकसीत करणे व सिमाभिंत बांधणेकामी मे. पांडुरंग एंटरप्रायजेस नि.र.रु.७,००,१२०/- (अक्षरी र.रु.सात लाख एकशे वीस फक्त) पेक्षा १२.५०% कमी या ठेकेदाराकडुन निविदा मंजुर दराने र.रु.६,१२,६०५/- पर्यंत काम करुन घेणेस तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटी प्रमाणे भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसीक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून कामाचा आदेश देणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणे.

विषय क्र.१६) जलनि:सारण विभागातील कार्यकारी अभियंता (क, इ, फ क्षेत्रीय कार्यालय) श्री भोसले यांचे कार्यालयीन वापरात असलेले वाहन क्र.MH-14/P-4412 (AMBESSEDOR ) या वाहनाचे टायर (ट्यूब सहित) मा.आयुक्त सो. यांचेकडील मान्य प्रस्ताव क्र-पापु/५/कावी/४२९/२०१६ दि १९/१२/२०१६नुसार चार नग टायर (ट्यूब सहित)

मे.एम.आर.एफ.टायर्स खडकी यांचेकडून खरेदी करणेत आलेले आहेत .त्याकरिता आगाऊ रक्कम धनादेश क्र.१०६०६९ दि.२६/१२/२०१६ रक्कम रुपये ११,६८४/- अदा करणेत आलेले आहेत. सदरील फर्मकडून दि.९/०३/२०१५ रोजी नवीन टायर वाहनाला बसवून देण्यात आले असून TAX INVOICE NO. 429392012 दि .२१/०१/२०१७ अन्वये रक्कम रुपये ११,६८७/- (अक्षरी र.रू.अकरा हजार सहाशे सत्याऐंशी फक्त) चे बिल देणेत आलेले असल्याने त्यास कार्योत्तर मान्यता देणे बाबत विचार करणे.

विषय क्र.१७) मे.प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि. पुणे यांना संगणक प्रणालींचे कामकाज देणेपुर्वी विकसित करणेत आलेल्या व त्यांची देखभाल दुरूस्ती मे. प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि. पुणे व मे. प्रिया टेक सोल्युशन्स पुणे यांचे मार्फत सुरू असलेल्या Assets & Works Management व e-Tendering System या दोन संगणक प्रणालींचा देखभाल दुरूस्तीचा कालावधी दि. ३०/०९/२०१६ रोजी पुर्ण झालेला असल्याने १ वर्ष कालावधि करीता मनुष्यबळ उपलब्ध करणेचे कामकाज मे. प्रोबिटी सॉफ्ट प्रा.लि. पुणे, यांना करारनामा करून देण्यास व त्याकरीता येणा-या र.रू.८,८८,३००/- (अक्षरी र.रू. आठ लाख अठ्याऐंशी हजार तीनशे फक्त) चे खर्चास मान्यता देणेबाबत विचार करणे.

विषय क्र.१८) श्री.पारधे स्वप्निल विजय, लिपिक यांचे अपिल अर्जावर विचार करणे. (मा.स्थायी समिती ठराव क्रमांक ३६६, दिनांक ११/०५/२०१७ नुसार)

**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव कार्यालय,
क्रमांक - नस/०३/कावि/१०८९/२०१७
दिनांक - २३/०६/२०१७

टिप - प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची विषयपत्रे (डॉकेटस) नगरसचिव कार्यालयात वाचणेसाठी ठेवणेत आलेली आहेत.